# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१७** **दिनांक - २३/०१/२०२४**

## महत्त्वाची सुचना

व्हॉट्स ॲप ग्रुप ॲडमिन तथा ग्रुप मधील सर्व सदस्य यांना आवाहान करण्यात येते की, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१/०१/२०२४ रोजी घडलेल्या घटनेबाबत नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच सदर प्रकरणी कायदेशिर तपास सुरु असुन पुराव्याच्या आधारावर आरोपी अटक करण्यात येत आहेत. सदर परिसरात वातावरण शांत असुन काही लोक सदर घटनेबाबत वेगवेगळे व्हीडीओ विविध प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित करीत असुन त्यामुळे समाजामध्ये गैरसमज पसरत आहे. तरी सदर घटनेबाबत कोणत्याही जाती-धर्माच्या लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील अश्या प्रकारचे कोणतेही आक्षेपार्ह मजकुर, व्हीडीओ, फोटो, स्टेटस इत्यादी प्रसारित करु नये. ज्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन सामाजिक शांतता भंग होईल अशा प्रकारचे आक्षेपार्ह माहिती, पोस्ट, व्हॉट्स ॲप वर किंवा इतर कोणत्या सोशल मिडीयावर प्रसारित केल्यास व्हॉट्स ॲप ग्रुप ॲडमिन तथा ग्रुप मधील सदस्य यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच प्रसारित केलेल्या आक्षेपार्ह मजकुर, फोटो, व्हीडीओ, पोस्ट पुरावा म्हणुन सादर करण्यात यईल.

---------------000000--------------